महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ६४ वा | दिनांक : ०३/१२/२०२४ | वार : मंगळवार

## भाजपने ठाकरेंसारखेच एकनाथ शिंदेंना फसवले : माजी मुख्यमंत्र्याचा आरोप



**मुंबई** : भाजपने उद्धव ठाकरे यांच्यासारखीच एकनाथ शिंदे यांची फसवणूक केल्याचा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. भाजपकडून पैसा व सत्तेच्या बळावर लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, महायुतीने यंदाची विधानसभा निवडणूक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात लढवली. त्यामुळे शिंदे यांची फसवणूक होणार नाही अशी अपेक्षा होती. पण भाजपने त्यांची उद्धव ठाकरे यांच्यासारखीच फसवणूक केली. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत उद्धव यांची फसवणूक केली होती. त्याच पद्धतीने आता शिंदे यांना फसवण्यात आले. सत्ताधाऱ्यांकडून निवडणुकीत पैसा व सत्तेचा गैरवापर करून लोकशाही नष्ट करण्यात आली. सत्ताधाऱ्यांनी सत्तेचा गैरवापर करून पोलिसांच्या गाड्यांमधून पैसे वाटले. पण निवडणूक आयोगाने त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. त्याने केवळ बघ्याची भूमिका घेतली.

पृथ्वीराज चव्हाण यांनी यावेळी ईव्हीएमवरही संशय व्यक्त केला. ते म्हणाले, केंद्रीय निवडणूक आयोगाला स्वायत्तता आहे. सध्या मुक्त वातावरणात पारदर्शकपणे निवडणुका घेतल्याचा दावा केला जात आहे. पण त्यानंतरही जनतेच्या मनात ईव्हीएमविषयी संशय आहे. आयोगाला ईव्हीएम सुरक्षित वाटते, तर मग सर्व मतदान यंत्रे व व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांच्या मोजणीला किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील इलेक्ट्रॉनिक तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याला सरकार का घाबरते?

सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार ठराविक मतदान यंत्रांतील मतचिठ्ठ्यांची तपासणी झाली, तरी त्यातून काही निष्पन्न होणार नाही. कारण, ठराविक मतदान यंत्रांमधील डेटा नष्ट केला जाऊ शकतो, असे चव्हाण म्हणाले.

पृथ्वीराज चव्हाण यांनी महायुतीवरही घणाघात केला. कोणत्याही निवडणुकीत जनतेचा विश्वास असणे अत्यंत गरजेचे आहे. पण जनतेला ईव्हीएमवर थोडाही विश्वास राहिला नाही. त्यामुळे जनतेतून पुन्हा एकदा बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याची मागणी होत आहे. लोकसभा निवडणुकीत जनतेने केंद्रातील भाजपा सरकारवर तीव्र नाराजी दर्शवली. पण त्यानंतर अवघ्या ४ महिन्यांत अचानक मतदारांच्या मनात एवढा बदल होऊन भाजप महायुती सरकारविषयी एवढा विश्वास संपादन होणे ही अशक्य व अविश्वसनीय गोष्ट आहे, असे ते म्हणाले.

## गुजरातच्या लबाडांचे लक्ष आता ठाणे, मुंबई महापालिकेवर : विनायक राऊत



**ठाणे** : गुजरातच्या लबाडांचे लक्ष ठाणे, मुंबई महापालिकेवर असल्याने सर्वांनी जागृत रहा आणि कामाला लागा असे आवाहन शिवसेना ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी केले आहे. विनायक राऊत हे ठाणे येथील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत होते. विधानसभा निवडणुकांमध्ये विरोधकांनी यंत्रणेचा वापर करून विजय मिळवला आहे. त्यामुळे आता झालेला पराभव विसरून कामाला लागले पाहिजे, असे आवाहन देखील यावेळी विनायक राऊत यांनी केले आहे.

ठाण्यात पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधतान विनायक राऊत म्हणाले, चोरांचे तावडीतून महाराष्ट्र सोडवायचा असेल तर, एकजुटीने काम करा. महापालिका निवडणुका कधीही लागू द्या आतापासूनच कामाला लागा आणि ठाणे महापालिकेवर हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचाच भगवा फडकवा, असे विनायक राऊत म्हणाले.

पुढे बोलताना विनायक राऊत म्हणाले, या निवडणुकीत पैसा आणि यंत्रणेचा वापर कसा झाला हे सर्वांनी पाहिले. विरोधकांनी सरळ मार्गाने हा विजय मिळवला नाही. त्यामुळे ही लोक म्हणजे सत्तेला चिकटलेली गोचीड आहेत, अशी टीका देखील विनायक राऊत यांनी यावेळी केली आहे. यावेळी राजन विचारे हे देखील उपस्थित होते. त्यांनी देखील कार्यकर्त्यांशी संवाद साधला आहे.

राजन विचारे यावेळी म्हणाले, ईव्हीएममुळे विरोधकांचा विजय झाला आहे. त्यामुळे खचून जाऊ नका, ठाणे महापालिकेवर हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा भगवा फडकवायला तयार रहा, असे आवाहन विचारे यांनी केले आहे. ही निवडणूक आपल्याला खूप काही शिकवून गेली.

जेव्हा प्रचार करताना आम्ही फिरत होतो. तेव्हा ठाणेकर जोरदार स्वागत करत होते. अनेक पदाधिकाऱ्यांवर प्रचंड दबाव दिसून आला. मात्र, यामधून समजले हे ठाणे शिवसेनेचे होते आणि पुढे देखील शिवसेनेचेच राहील, असे मत ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे यांनी मांडले आहे.

## भाजपकडून एकनाथ शिंदेंची कोंडी करण्याचा प्रयत्न : आमदार बच्चू कडू



**अमरावती** : भारतीय जनता पक्षाकडून तुमची कोंडी करण्याचा प्रयत्न होईल, असे मी एकनाथ शिंदे यांना अनेकवेळा सांगितले असल्याची माहिती आमदार बच्चू कडू यांनी दिली आहे. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू असून एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा आहे. यावर आमदार बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

आमदार बच्चू कडू म्हणाले, मी एकनाथ शिंदे यांना सांगितले होते, बऱ्याचवेळा सांगितले होते की भारतीय जनता पक्षाकडून तुमची कोंडी करण्याचा प्रयत्न होईल. कारण एकनाथ शिंदे हे एकमात्र मुख्यमंत्री असे होते की रात्री दोन वाजता देखील सर्वसामान्य माणसांना भेटायचे. असा पहिला मुख्यमंत्री मी पाहत होतो. त्यामुळे भाजपला कधीकाळी असे वाटले होते की एकनाथ शिंदे यांना आपण थोडे दाबून ठेऊ, असे बच्चू कडू म्हणाले आहेत.

पुढे बच्चू कडू म्हणाले, एकनाथ शिंदे सत्तेत असल्याने त्यांना दाबून ठेवणे शक्य झाले नाही. मात्र, एकनाथ शिंदे यांचे काम बोलत होते. त्यामुळे एकनाथ शिंदे यांची कोंडी करण्याचा प्रयत्न होणार होता. कारण भाजपला एकहाती सत्ता घ्यायची आहे, असे बच्चू कडू म्हणाले आहेत.

दरम्यान, महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमताने यश मिळाले आहे. मात्र, निवडणुकीचा निकाल लागून आता आठ दिवस होऊन गेले तरी देखील अद्याप सरकार स्थापन झाले नाही. मुख्यमंत्री पदावरून महायुतीमध्ये मतभेद असल्याचे बोलले जात आहे. तसेच मुख्यमंत्री पद नाही तर गृहमंत्री पद देण्याची मागणी शिंदे गटाकडून केली जात आहे. मात्र, यास देखील भाजपचा विरोध असल्याचे दिसत आहे.

सरकार स्थापनेसाठी पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार दिल्लीत गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेण्यासाठी जाणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र, एकनाथ शिंदे हे प्रकृतीच्या कारणास्तव या बैठकीला जाणार नसल्याचे समोर आले आहे. एकनाथ शिंदे सध्या ठाणे येथील त्यांच्या निवासस्थानी विश्रांती घेत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३ डिसेंबर २०२४


## विठोबाच्या माळावर विठ्ठल-रुक्माईच्या भेटीला पंचक्रोशीतील भाविकांची अलोट गर्दी.....

### यात्रेत नागरिकांनी घेतला मनसोक्त आनंद.....



मुरूम, ता. उमरगा येथील माळावरील विठ्ठल-रुक्माईच्या यात्रेत सुंदरवाडी येथून श्री दुधागिरी महाराज, विठ्ठल रुक्माईची पालखी व काटी दुपारी टाळ मृदुंगाच्या गजरात, हलगीच्या निनादात वाजत-गाजत मंत्रमुग्ध झालेला भावी भक्त

**मुरूम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुरुम, ता. उमरगा येथील माळावरील श्री विठ्ठल-रखुमाई मंदिरात दरवर्षी कार्तिकी अमस्येला या यात्रेची परंपरा व संस्कृती आजही मोठ्या प्रमाणात भक्तांकडून जपली जाते. यंदाही मोठ्या प्रमाणात भाविक पायी चालत यात्रेत उत्स्फूर्त सहभागी झाले होते.

यावेळी भक्तिमय वातावरणात भाविकांनी रविवारी (ता. १) रोजी विठ्ठल-रुक्माईचे रांगा लावून दर्शन घेतले. यंदा अधिक पाऊस झाल्याने कडाक्याची थंडी असताना या यात्रेत भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

मंदिर परिसरात विविध प्रकारची दुकाने थाटण्यात आली होती. पंचक्रोशीतील अनेक गावातील नागरिक या यात्रेत सहभागी होऊन आनंद लुटताना दिसत होते.

गेल्या अनेक वर्षांपासूनची या यात्रेची परंपरा असून सुंदरवाडी येथून श्री दुधागिरी महाराज, विठ्ठल-रुक्माईची पालखी व काटी दुपारी टाळ मृदुंगाच्या गजरात, हलगीच्या निनादात वाजत-गाजत आणण्यात आली.

मंदिरात प्रस्थान होऊन विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी काला फोडल्यानंतर यात्रा फुटते. याप्रसंगी या यात्रेत विविध खाद्यपदार्थ, फळ-फळावळे, चिमुकल्यासाठी खेळण्या, कपडे, सौंदर्य प्रसादने, मनोरंजनाची दुकाने थाटलेली होती. या यात्रेमध्ये झोके, झोपाळे व विविध प्रकारची साहित्य लोकांच्या मनोरंजनासाठी लावण्यात आली होती. यातूनही लहान-थोर मंडळींनी या यात्रेचा मनसोक्त आनंद घेतला.

पूर्वी मुरूमच्या पंचक्रोशीतील यात्रेसाठी बैलगाड्या जुंपल्या जायच्या. त्या माध्यमातून शेतकरी, शेतमजूर आपल्या बाळगोपाळांसह या यात्रेत भक्ती भावाने सहभागी व्हायचे. मात्र कालांतराने बैलगाड्याची जागा आता मोटार सायकल, चार चाकी वाहने, रिक्षा घेऊन लोक मोठ्या संख्येने सहभागी होताना दिसत होते.

मुरूम पोलीस प्रशासनाच्यावतीने यात्रेत अनुचित प्रकार घडू नये. याकरिता पोलीस ठाण्याचे सपोनि डॉ. सदिपान दहीफळेसह पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मुरूम नगर परिषदेकडूनही यंत्रणा सज्ज करण्यात आली होती. एकंदरीत या पंचक्रोशीतील वाड्या, तांड्या वस्तीवरील लोक या विठोबा माळावरील श्री विठोबा यात्रा अतिशय भक्तिमय वातावरणात आणि शांततेत पार पडली.

दुसऱ्या दिवशी हीच यात्रा मुरूम शहरात भरवली जाते. याला शिळी यात्रा म्हणून अनेक पिढ्यांपासून संबोधले जाते.

## पाच हजार सरकारी शाळांना निवडणुकीनंतर पहिला दणका

**कन्नड (अरुण थोरात):** विधानसभा निवडणुकीनंतर १० पेक्षा कमी पटसंख्येच्या सुमारे ५ हजार शाळांना पहिला दणका बसणार असल्याची भीती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ने व्यक्त केली असून या शाळा वाडी, शहरालगत च्या झोपडपट्टीची वस्ती, आदिवासी पाडे, वंजारी समाजाचे तांडे, काही लहान गावांतल्या शाळांसह दलित वस्तीतल्या एकूण ५ हजार सरकारी शाळांतील शिकविण्याची जबाबदारी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या कंत्राटी शिक्षकांच्या हवाली करण्यात येणार आहे.

यातून गरीब वस्तीतील कुटुंबातली सज्ञान पिढी घडविण्याच्या संकल्पनेलाच सुरुंग लागणार आहे. यानंतर २० पेक्षा कमी पटसंख्येच्या सुमारे १४ हजार सरकारी शाळांवर गंडांतर येणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या शाळांतून शिक्षण घेणाऱ्या किमान पावणेदोन लाख गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जालाच दणका बसणार आहे.

१० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांतील विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी १५ हजार रुपये दर महिन्याच्या वेतनावर १ वर्षाकरिता नियुक्त केलेल्या शिक्षकांवर सोपविली जाणार आहे.

या शिक्षकांकरिता किमान शैक्षणिक पात्रता अटही शिथिल केली गेली आहे. या सरकारी धोरणाच्या अंमलबजावणीची सुरुवात करण्याचा निर्णय सांगली जिल्हा परिषदेने काढला आहे.

याकरिता पहिला शासकीय आदेश दि. १५मार्च २०२४ रोजी काढला गेला होता. दुसरे परिपत्रक शालेय शिक्षण तसेच क्रीडा संचलनालयाने २६ ऑक्टोबर २०२४ रोजी काढले. त्यात २४ डिसेंबर २०२४ पूर्वी एक वर्षाकरिता कंत्राटी शिक्षक नियुक्त केले जावेत, असे नोंदविले आहे.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांच्या कमी पटसंख्येची अट फक्त सरकारी शाळांनाच असून खासगी शाळांना ही पटसंख्येची अट लागू नाही. पटसंख्येच्या निकषावर सरकारी शाळा बंद करून प्राथमिक शिक्षणाचे क्षेत्र पूर्णपणे कार्पोरेट क्षेत्राच्या हवाली करण्याच्या शासकीय धोरणाचा यातून संशय शिक्षणप्रेमींना यायला लागला आहे.

यात संविधानातील कलम २१ (अ), विद्यार्थ्यांच्या मोफत शिक्षणाचा हक्क कायदा २००९ बासनात गुंडाळले जात असल्याचेही भान राखले गेले नाही. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात, याच उक्तीप्रमाणे महायुती सरकारचे पाय धोरणात दिसू लागले आहेत.

यात शैक्षणिक नुकसान होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सज्ञानतेलाच सुरुंग लागून या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे भवितव्य अंधारात लोटण्याचाच हा प्रकार आहे.

पालकांनी याबाबत लगेचच सावध होण्याची गरज आहे.

वस्ती, तांडे, पाडे, दलित वस्तीत हलाखीचे जीवन जगणाऱ्या कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रभावित होणार. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास, शिक्षणाचे सामाजिकीकरण, या धोरणासोबत विसंगत आहे.

एक वर्षाचा कंत्राटी शिक्षक बदलून किंवा नोकरी सोडून गेल्यास या विद्यार्थ्यांच्या पूर्वीच्या शैक्षणिक दर्जाची जबाबदारी कोणावर, हाही प्रश्नच आहे. समाजातील घटकांनी याबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.-

**विजय कोंबे,**
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती


बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.


## यूपीतील शेतकरी आठवडाभर दिल्लीकडे कूच करणार नाहीत

**नोएडा :** उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांचा दिल्लीकडे जाणारा मोर्चा आठवडाभरासाठी थांबवण्यात आला आहे. ग्रेटर नोएडा, नोएडा आणि यमुना प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत शेतकरी नेत्यांच्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

दलित प्रेरणास्थळावर आठवडाभर थांबणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. आठवडाभरात काही गोष्टी मान्य न झाल्यास आम्ही पुन्हा दिल्लीला जाऊ. यानंतर नोएडा एक्सप्रेस वेवरून बॅरिकेडिंग हटवण्यात आले असून यातायात सुरू झाली आहे.

याआधी सोमवारी दुपारी १२ वाजता नोएडा येथील महामाया फ्लायओव्हरजवळ शेतकरी जमा झाले. संसदेला घेराव घालण्यासाठी ते दिल्लीकडे निघाले असता दलित प्रेरणा स्थळावर पोलिसांनी त्यांना अडवले. यावेळी शेतकऱ्यांची पोलिसांशी बाचाबाची झाली.

शेतकऱ्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी दिल्ली-यूपीला जोडणाऱ्या चिल्ला सीमेवर ठिकठिकाणी बॅरिकेड्स लावले होते. मात्र, शेतकऱ्यांनी पोलिसांचे बॅरिकेड्स तोडले. मात्र, वज्र वाहन आणि आरएएफचे जवान तैनात करण्यात आले होते, ड्रोनद्वारे पाळत ठेवली जात होती. नोएडा एक्सप्रेस वे दोन्ही बाजूंनी बंद करण्यात आल्याने आणि वाहनांची तपासणी करण्यात आल्याने ५ किलोमीटर लांब जाम झाला होता.

शेतकऱ्यांच्या मागण्या... भूसंपादनाच्या बदल्यात शेतकऱ्यांना १० टक्के भूखंड देण्यात यावा. शेतकऱ्यांना ६४.७ टक्के दराने भरपाई मिळावी.

नवीन भूसंपादन कायद्यानुसार बाजारभावाच्या चार पट नुकसान भरपाई मिळायला हवी.

जमीनदार आणि भूमीहीन शेतकऱ्यांच्या मुलांना रोजगार आणि पुनर्वसनाचे सर्व फायदे मिळावेत.

मोर्चाबाबत ठाम असलेले शेतकरी आणि तिन्ही अधिकारी यांच्यात अनेक तास चर्चा झाली. यावेळी ग्रेटर नोएडा, नोएडा आणि यमुना प्राधिकरणाने शेतकऱ्यांकडून एक आठवड्याचा वेळ मागितला. अधिकाऱ्यांचे म्हणणे शेतकऱ्यांनी मान्य केले आहे.

दलित प्रेरणास्थळावर आठवडाभर थांबणार असल्याचे शेतकरी सांगतात. आठवडाभरात यावर एकमत न झाल्यास किसान मोर्चा दिल्लीकडे कूच करेल. सध्या एक्सप्रेस वेवरून बॅरिकेडिंग हटवण्यात आले असून यातायात सुरू झाली आहेत.

नोएडा एक्सप्रेस-वेची एक लाईन खुली करण्यात आली. मुख्य सचिवांशी चर्चा करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. जोपर्यंत त्यांच्या मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत राष्ट्रीय दलित प्रेरणा स्थळ सोडणार नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

आंदोलक शेतकरी नोएडा एक्स्प्रेस वेपासून दूर गेले आहेत. राष्ट्रीय दलित प्रेरणा स्थळाजवळ शेतकरी जमले आहेत. गाझियाबाद, नोएडा आणि यमुना प्राधिकरणाचे अधिकारी शेतकऱ्यांशी बोलत आहेत. काही वेळातच एक्सप्रेस वे पूर्णपणे खुला केला जाईल. एक लेन नुकतीच उघडली आहे. मुख्य सचिवांशी बोलून भेट घेण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. जोपर्यंत त्यांच्या मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत ते राष्ट्रीय दलित प्रेरणा स्थळ सोडणार नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांच्या 'दिल्ली चलो' मोर्चावर केंद्रीय मंत्री चिराग पासवान म्हणाले - सरकार शेतकऱ्यांचे ऐकण्यास आणि त्यांच्याशी बोलण्यास तयार आहे. मागच्या वेळी ज्या कायद्यांवर त्यांचा आक्षेप होता ते सरकारने कोणत्याही अटीशिवाय मागे घेतले. यावरून सरकारचा हेतू दिसून येतो की आमचे केंद्रातील एनडीए सरकार पूर्णपणे शेतकऱ्यांच्या भावनांसोबत काम करण्याचा प्रयत्न करत आहे. सरकारने चर्चेचा मार्ग मोकळा केला आहे. मला वाटते आधी संवाद व्हायला हवा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३ डिसेंबर २०२४


## आफ्रिकन देश गिनीमध्ये फुटबॉल सामन्यादरम्यान हिंसाचार : १०० जणांचा मृत्यू

**कोनाक्री :** गिनीतील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे शहर जेरेकोर येथे रविवारी फुटबॉल सामन्यादरम्यान झालेल्या हिंसाचारात सुमारे १०० लोकांचा मृत्यू झाला. न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार, रविवारी लबे आणि गेरेकोर फुटबॉल संघांमध्ये सामना सुरू होता. यादरम्यान मंच रेफरींनी वादग्रस्त निर्णय दिला, त्यामुळे दोन्ही संघांमध्ये हाणामारी झाली. हाणामारी होत असल्याचे पाहून प्रेक्षकही मैदानात घुसले आणि हिंसाचाराला सुरुवात केली.

एएफपीच्या वृत्तानुसार, लोकांनी एन'जेरेकोर मधील पोलिस स्टेशनची तोडफोड केली आणि आग लावली. या घटनेची माहिती देताना स्थानिक रुग्णालयातील डॉक्टर म्हणाले- हा सामना गिनी आर्मी आर्मी जनरल मामादी डुम्बौया यांच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात आला होता. २०२१ मध्ये गिनीमध्ये सत्तांतर करून डोंबौयाने सत्ता काबीज केली.

डोंबौया यांनी सप्टेंबर २०२१ मध्ये अध्यक्ष अल्फा कोंडे यांचे सरकार पाडले आणि स्वत: सत्ता घेतली. आंतरराष्ट्रीय दबावामुळे त्यांनी २०२४ च्या अखेरीस निवडणुका होतील असे सांगितले होते, परंतु आतापर्यंत निवडणुका होण्याची शक्यता नाही.

डोंबौया यांनी जानेवारी २०२४ मध्ये कर्नल ते लेफ्टनंट जनरल म्हणून पदोन्नती घेतली होती. गेल्या महिन्यात त्यांनी स्वत:ला गिनीचा सेनापती म्हणून घोषित केले.

डोंबौया यांच्या कार्यकाळात विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते. तज्ज्ञांच्या मते डोंबौया पुढील वर्षी निवडणुका घेऊ शकतात. डोंबौयाही निवडणूक लढवू शकतात. त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढवण्यासाठी ते देशाच्या विविध भागात फुटबॉल स्पर्धा आयोजित करत आहेत.

इंडोनेशियामध्ये २०२२ मध्ये अशीच एक दुर्घटना घडली होती. तेव्हा फुटबॉल सामन्यादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत १७४ जणांचा मृत्यू झाला. या अपघातात दोन पोलिसांनाही प्राण गमवावे लागले. सामन्यादरम्यान, संघ हरल्यानंतर त्याचे चाहते मैदानात उतरले. या गर्दीला आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला आणि अश्रुधुराच्या नळकांड्या सोडाव्या लागल्या.

हा सामना अरेमा फुटबॉल क्लब आणि पर्सेबाया सुराबाया यांच्यात होता. सामन्यादरम्यान सुमारे ४२ हजार प्रेक्षक स्टेडियममध्ये उपस्थित होते. हे सर्व प्रेक्षक अरेमा फुटबॉल क्लबचे चाहते होते. आयोजकांनी पर्सेबाया सुरबाया चाहत्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून येण्यास बंदी घातली होती.

# जागतिक एड्स दिनानिमित्त रेड रिबनक्लब तर्फे रॅलीचे आयोजन




**कन्नड (अरुण थोरात):** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी व जिल्हा एड्स प्रतिबंध पथक जिल्हा रूग्णालय (डापकु) छ.संभाजीनगर तसेच ग्रामीण रुग्णालय कन्नड तर्फे एड्स जनजागृती निमित्त प्रभात फेरी चे दि. २ डिसेंबर रोजी ग्रामीण रुग्णालय कन्नड ते गिरणी ग्राउंड कन्नड येथे आयोजन करण्यात आले होते.

त्यानिमित्त शिवाजी कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कन्नड रेड रिबन क्लब, एन.सी.सी. एन.एस. एस. विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सर्व प्रथम प्राचार्य डॉ. व्ही.एन. भोसले ह्यानी रॅली ला मार्गदर्शन करुण हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली.

या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. मगर, डॉ. संघई, डॉ. अहिरराव, एन. सी. सी. प्रमुख डॉ. मातकर, डॉ. महाजन, डॉ. क्षीरसागर, डॉ. साखरे, विद्यार्थी गायत्री खोसरे, ओंकार शेळके, रोहित क्षीरसागर आदी उपस्थित होते.

ग्रामीण रुग्णालय कन्नड येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. सिकंदर यांनी गिरणी ग्राउंडवर जनजागृतीपर विद्यार्थ्यांना शपथ देऊन मार्गदर्शन केले. या रॅलीत शहरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येत सहभाग घेतला.

जागतिक एड्स दिन निमित्त विविध उपक्रम राबविण्यास महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण पथक मुंबई तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, जिल्हा समन्वयक साधना गंगावणे, ग्रामीण रुग्णालय कन्नड येथील श्री. सोनवणे यांच्यासह सर्व कर्मचारी ह्यांचे सहकार्य मिळाले.

# कविता महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी सर्वतोपरीप्रयत्न करू - सुधीर घुगे




**कन्नड (अरुण थोरात):** ग्रामीण भागात वाचन चळवळ वाढावी, माणसा माणसात संवाद घडावा, विचारांची देवाण घेवाण व्हावी, तसेच विद्यार्थी व तरुण पिढीवर चांगले सुसंस्कार व्हावेत, यासाठी ग्रामीण भागात वाङ्मयीन उपक्रम होणे आवश्यक आहे.

तिफण कविता महोत्सवाच्या माध्यमातून साहित्य क्षेत्रात महत्वाचे योगदान देत आहे, याचा आम्हास सार्थ अभिमान असून मेहेगाव येथील भगवानगडावर दि. ५ जानेवारी रोजी होणारा कविता महोत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू असे आवाहन भगवानगडाचे अध्यक्ष तथा सातव्या तिफण कविता महोत्सव संयोजन समितीचे अध्यक्ष सुधीर घुगे यांनी केले.

भगवानगडावर कविता महोत्सवाच्या आयोजना साठी आयोजित बैठकित दि. १ डिसेंबर रोजी आयोजीत बैठकीत बोलत होते. यावेळी ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज जायभाये, ॲड. कृष्णा जाधव, भगवानराव कांदे, डॉ. अंबादास सगट, डॉ. संजय गायकवाड, पत्रकार दत्ता मोरस्कर, नाना लहाने, संशोधन परिषदेचे तालुका अध्यक्ष प्रविण दाभाडे यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी डॉ. संजय गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. तर डॉ. अंबादास सगट, ॲड. कृष्णा जाधव, बन्सिधर निकम, भगवानराव गिते, लक्ष्मण वाल्डे, प्रविण दाभाडे, ज्ञानेश्वर गायके, कृष्णा घुगे, किशोर घुगे यांनी मनोगत व्यक्त केले.

कविता महोत्सवाचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी कविता महोत्सवाच्या आयोजना मागची भूमिका विशद केली. अध्यक्षीय समारोप सुधीर घुगे यांनी केला.

या बैठकित कविता महोत्सवाचे नियोजन, कार्यक्रमाचे स्वरूप यावर चर्चा करण्यात आली.

संयोजन समिती निवडण्यात आली. याप्रसंगी पुंडलिकराव घुगे, सूर्यभान घुगे, रघुनाथ घुगे, भगवानराव लहाने, रमेश घुगे,अशोकराव पवार, श्रीराम दापके, विनोद जाधव, मच्छिंद्र मुगले, मच्छिंद्र वाघ, देवमन घुगे, संजय घुगे, दीपक आखाडे, गजानन घुगे, प्रमोद पवार, परवेझ शेख, अरुण मोकासे, पप्पु सेट दवंगे, विजय शेजवळ, विजय जाधव, नितीन नागरे, अमोल सोनवणे, खंडू सोनवणे, सुनिल पाटणी, अंकुश सोनवणे, कचरू जंगम, अनंत मिळ, संकेत शिंदे, गणेश नागरे, सुभाष घुगे, ज्ञानेश्वर घुगे, भगवान घुगे आदींची उपस्थिती होती. बैठकीसाठी भगवानगडाच्या परिसरातील सरपंच, कार्यकर्ते, शिक्षक, शेतकरी, पत्रकार,मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आभार स्वागताध्यक्ष गणेश घुगे यांनी मानले.

## एकनाथ शिंदेंच्या तब्येतीमुळे बैठक रद्द : संजय शिरसाट

**मुंबई :** काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कालच त्यांच्या दरे गावावरून परतले. आज त्यांनी शिवसेनेच्या नेत्यांची बैठक बोलावली होती. मात्र, त्यांची तब्येत पुन्हा बिघडल्याने डॉक्टरांनी आरामाचा सल्ला दिला आहे. यांनतर शिवसेना नेते संजय शिरसाट एकनाथ शिंदे यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी गेले होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधत विविध विषयांवर भाष्य केले.

आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या तब्येतीची माहिती घेण्यासाठी आलो आहोत. एकनाथ शिंदेंच्या तब्येतीबाबत विरोधकांनी लावलेले आरोप खोटे आहेत. डॉक्टरांनी त्यांना पूर्णपणे आराम करण्यास सांगितले आहे. त्यामुळे शिंदे साहेब सकाळपासून कुणाला भेटले नाहीत. ते आराम करत आहेत, असे संजय शिरसाट म्हणाले.

संजय शिरसाट यांनी श्रीकांत शिंदे यांच्या उपमुख्यमंत्री पदाबाबत दिलेल्या स्पष्टीकरणावरही भाष्य केले. श्रीकांत शिंदे यांनी कधीही मी महाराष्ट्राच्या राजकारणात येईल असे सूतोवाच केले नाही. ते उपमुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत नाहीच. ते दिल्लीतील राजकारण पाहणार आहेत. महाराष्ट्रातील राजकारणात दखल देणार नाहीत, असे शिरसाट म्हणाले.

एकनाथ शिंदे आणि भाजपमध्ये खाते वाटपाबाबत कोणतीही चर्चा झाली नाही. भाजपचे वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील, त्याचे पालन केले जाईल. आज संध्याकाळी व्हिडिओ कॉन्फ्रेसद्वारे देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि भाजपचे वरिष्ठ नेते या बैठकीत सहभागी होतील. या बैठकीत खाते वाटपावर तोडगा निघू शकेल. या सर्व गोष्टींचा उद्या संध्याकाळपर्यंत चित्र स्पष्ट होईल, असेही शिरसाट यांनी सांगितले.